# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०३/०६/२०२४ (सोमवार) सायंकाळ

---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ०१/०६/२०२४ चे १३.०० वा. ते १६.०० वा. दरम्यान पोस्टे खापा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, खापा हद्दीतील मौजा रायवाडी येथे एक ट्रक मध्ये अवैधरीत्या विनापरवाना रेती लोड करून वाहतूक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा रायवाडी येथे नाकाबंदी केली असता ट्रक क्र. एम एच– ४०/ए.के –७१३२ चा चालक **आरोपी नामे– १) जितेन्द्र ज्ञानेश्वर बास्कवरे, वय ३२ वर्ष, रा. चारगाव व मालक नामे–२) विनोद गुप्ता रा. नागपुर कोबेल्को कंपनी एसके २२० निळया रंगाचा पोकलॅन्डचा चालक व मालक** यांनी अवैध रेती उत्खनन करून वाहनासह घटनास्थळाहुन पळुन गेले. आरोपी यांचेविरुद्ध पोस्टे खापा येथे कलम ३७९, १०९ भारतीय दंडविधान संहीता–१८६०, सहकलम ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम–१९६६, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ अन्वये पो. स्टे. खापा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. १) याला अटक करण्यात आली असुन आरोपीकडुन मुद्देमाल हस्तगत करणे बाकी आहे. गुन्हयाचा पुढील तपास खापा पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापा येथील ठाणेदार सपोनि सुनिल दहीभाते यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर